N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** सिडको

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0103 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 25/02/2026 00:34

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Date From (दिंनाक पासून):** 24/02/2026
**Time Period (कालावधी):** पहर 7
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 24/02/2026
**Time From (वेळेपासून):** 18:48 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 25/02/2026 **Time (वेळ):** 00:19 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 001
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 25/02/2026 00:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हटेल दादा डोसा टिव्ही सेंन्ट्र,छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शांतीलाल देविदास चव्हाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नोकरी, पद-पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर,सिडको ,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नोकरी, पद-पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर,सिडको ,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8888390777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.रानोबा विठोबा काथार | | | 1. वसंतनगर, जाधववाडी, दत्तमंदिराजवळ,छत्रपती संभाजीनगर ,सिडको ,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
दिंनाक 24 /02/2026.
मी शांतीलाल देविदास चव्हाण वय 43 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिंबधक विभाग छत्रपती संभाजीनगर रा. एकता नगर, हर्सुल, छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 8888390777.
मी वरील प्रमाणे असून लाचलुचपत प्रतिंबधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे मागील एक वर्षापासुन पोलीस निरीक्षक म्हणुन काम करतो. यातील मुळ तक्रारदार श्री.नितिन नंदु चव्हाण वय 33 वर्षे, व्यवसाय- शेती व खाजगी नोकरी ह.मु. रा. गजानन नगर, गल्ली नं.3, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर, मुळ रा. रहाळपटटी तांडा, पोष्ट जटवाडा, ता.जि. छत्रपती संभाजीनगर यांनी दिंनाक 16/02/2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे हजर येवुन दोन शासकिय पंच व आमचे समक्ष त्यांचेकडे लोकसेवकाकडुन होत असलेल्या लाचमागणी बाबत लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे.
"´Öß नितिन नंदु चव्हाण वय 33 वर्षे, व्यवसाय- शेती व खाजगी नोकरी ह.मु. रा. गजानन नगर, गल्ली नं.3, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर, मुळ रा. रहाळपटटी तांडा, पोष्ट जटवाडा, ता.जि. छत्रपती संभाजीनगर मो. क्र. 9370362776
आज दिंनाक 16/02/2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर कार्यालय येथे हजर येवुन पो.नि. शांतीलाल चव्हाण लाचलुचपत प्रतिंबधक विभाग छत्रपती संभाजीनगर व दोन शासकिय पंच यांचे समक्ष माझ्याकडे होत असलेल्या लाचमागणी बाबत तक्रार देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असून कॉन्ट्रेक्टर श्रीमती दर्शना बबन चव्हाण रा.बनवाडी तांडा, पोष्ट जटवाडा यांचेकडे सुपरवायझर म्हणुन खाजगी नौकरी करतो तसेच शेती व्यवसाय करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.
कॉन्ट्रेक्टर श्रीमती दर्शना बबन चव्हाण रा.बनवाडी तांडा यांनी मौजे रहाळपटटी तांडा ग्रामपंचायतीचे वॉटर सप्लाय, सिमेंटरोड, पेव्हरब्लॉक, घनकचरा व इतर असे कामे ग्रामपंचायती कडून ई निवीदानुसार घेतलेले आहेत. कॉन्ट्रेक्टर श्रीमती दर्शना चव्हाण यांचेकडील वर नमुद कामाची देखरेख माझ्याकडेच असते. सदर कामे करुन घेणे, कामावरिल लोकांचे पैसे वाटप तसेच वर्क ऑडर, कामाचे बिल, रोख रक्कमे संदर्भातील कामे, ग्रामपंचायती अंतर्गत व इतर शासकिय कार्यालयातील सर्व कामे, सुपरवायझर म्हणुन मलाच करावी लागते.
कॉन्ट्रेक्टर श्रीमती दर्शना बबन चव्हाण यांनी मौजे रहाळपटटी ग्रामपंचायत अंतर्गत केलेल्या कामाचे बिल मंजुरी नंतर त्यांचे एचडीएफसी बँक खात्यावर जमा होत असते तसेच जमा झालेल्या बिला संदर्भात श्रीमती चव्हाण या मला कळवत असतात. त्यानुसार रहाळपटटी ग्रामपंचायतीचे Under Gram Nidhi Fund योजने अंतर्गत Water Supply PVC Pipeline work Rahalpatti Tanda at Rahalpatti tanda GP Rahalpatti Tq.Dist Chh.S.Nagar Tender ID 2025 नुसार केलेल्या कामाचे बिल 4,64,370/- रुपये दिंनाक 03/01/2026 रोजी तसेच घनकचरा संदर्भातील बिल असे श्रीमती दर्शना चव्हाण यांचे एचडीएफसी बँक खात्यावर जमा झाले असल्याची माहिती श्रीमती चव्हाण मॅडम यांनी मला दिली होती.
दिंनाक 02/02/2026 रोजी मी मौजे रहाळपटटी ग्रुप ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक श्री. काथार यांची भेट घेतली व त्यांना श्रीमती चव्हाण मॅडम यांचेकडे असलेल्या संत सेवालाल महाराज बंजारा लमांनतांडा संमृध्दी योजना अंतर्गत गावात केलेले सिमेंट रस्ते व पेव्हर ब्लॉक कामाचे बिल जमा करण्या संदर्भात विचारणा केली, तसेच यापुर्वी पुर्ण झालेल्या कामाचे अनामत रक्कमेचे डी.डी.व चेक देण्या बाबत विंनती केली असता श्री. काथार हे मला म्हणाले की, तुमच्या कॉन्ट्रेक्टर मॅडमचे वॉटर सप्लायचे बिल सुमारे 4,64,370/-रुपये व घन कचऱ्याचे बिल मी त्यांचे खात्यावर जमा केले आहे. आता आधी जमा झालेल्या बिलाच्या हिशोबाने पाच टक्के रक्कम मला दयावी लागेल त्यानंतर पुढील बिल मी काढील व अनामत रक्कमचे चेक मॅडमच्या खात्यावर जमा करील. त्यावर मी श्री.काथार



Scanned with OKEN Scanner

ग्रामसेवक यांना म्हणालो की, पाच टक्के रक्कम जास्त होत आहे काही कमी करा त्यावर श्री.काथार हे म्हणाले की, किमान 20000/-रुपये रक्कम दयावीच लागेल नंतरच पुढील बिल काढणार मी, त्यावर नाविलाजाने मी त्यांना श्रीमती चव्हाण मॅडम यांना विचारुन सांगतो तुम्हाला असे म्हणुन आलो आहे. सदर माहिती मी कॉन्ट्रेक्टर श्रीमती चव्हाण मॅडम यांना सांगितली त्यावर श्रीमती चव्हाण मॅडम यांनी मला आपण नियमानुसार काम करतो. नियमानुसार अनामत रक्कम आपल्याला मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे श्री.काथार यांना लाच न देता नियमानुसार त्यांची तक्रार करा असे सांगितले आहे. तरी माझी ग्रामसेवक श्री.काथार यांचेशी कोणतेही वैर अगर दुष्मणी नाही त्यांचा व माझा देण्याघेण्याचा अगर उसनवारीचा कसालाही व्यवहार नाही.

तरी मी आज दि.16/02/2026 रोजी श्री काथार ग्रामसेवक यांना फोनवर संपर्क करुन ते सांगतील त्या ठिकाणी त्यांना भेटण्यास जाणार आहे. त्यावेळी मी ग्रामसेवक श्री.काथार यांना श्रीमती चव्हाण मॅडम यांचेकडे असलेल्या संत सेवालाल महाराज बंजारा लमांनतांडा संमृध्दी योजना अंतर्गत गावात केलेले सिमेंट रस्ते व पेव्हर ब्लॉक कामाचे बिल तसेच पुर्वी केलेल्या कामाची शासनाकडे जमा असलेल्या अनामत रक्कमेचे चेक जमा करण्या संदर्भात विंनती करणार आहे. त्यावेळी श्री. काथार यांनी माझ्याकडे मौजे रहाळपटटी Under Gram Nidhi Fund योजने अंतर्गत केलेल्या पाणी पुरवठा कामाचे बिल व घनकचरा चे बिल जमा केले त्याचे बक्षीस म्हणुन 20,000/-रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वत: किंवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विंनती आहे.

मला वाचता येते पण चांगले लिहता येत नसल्याने सदर बाब मी पोलीस निरीक्षक व दोन्ही पंचाना सांगितली. त्यामुळे माझी तक्रार कार्यालयातील संगणकावर टंकलीखीत केली असुन मी वाचुन पाहिली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी †ÖÆêü."®Ö´Öã¤ü मजकुराची तक्रार पंच व आमचे समक्ष देण्यात आली सदर तक्रार पंचानी व मुळ तक्रारदार यांनी वाचुन पाहिली व त्यानंतर त्यावर मी, मुळ तक्रारदार व पंच अशांनी स्वाक्षरी केल्या आहेत.
सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुळ तक्रारदार श्री.नितिन चव्हाण यांचेकडे रहाळपटटी तांडा येथील ग्रामसेवक श्री.काथार हे लाच मागणी करत आहेत अगर कसे या करिता लाचमागणी पडताळणी आवश्यक असल्याने दि. 16/02/2026 रोजी ग्रामसेवक श्री.काथार यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे मुळ तक्रारदार, दोन पंच असे आम्ही सर्वानुमते निर्णय घेतला. त्यानंतर मुळ तक्रारदार श्री.नितिन चव्हाण व दोन्ही पंचाना लाचमागणी पडताळणी कारवाई बाबत योग्य त्या सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हॉईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे मुळ तक्रारदार व दोन्ही पंच यांना सांगून सोनी कंपनीचा व्हॉईस रेकॉर्डर दाखवला, तसेच रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मुळ तक्रारदार श्री. नितिन चव्हाण यांनी अंगावर परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही असा ठेवुन दिला. त्यानंतर पंच क्र.1 श्री.साजीद बेग व मुळ तक्रारदार असे तक्रारदार यांचे खाजगी चारचाकी वाहनात बसुन दि. 16/02/2026 रोजी 17.56 वाजता सुरक्षीत ठिकाणावरुन टि.व्ही.सेंटर परिसर छत्रपती संभाजीनगरकडे श्री.काथार यांचे भेटीसाठी रवाना केले.
तक्रारदार श्री.नितिन चव्हाण व पंच क्र.1 श्री.साजीद बेग हे दि.16/02/2026 रोजी 18.44 वाजेच्या सुमारास सापळा पथक थांबल्या ठिकाणी परत आले त्यावेळी पंच क्र. 2 यांचे समक्ष पंच क्र. 1 श्री. साजीद बेग यांना तुम्ही लाप्रवि कार्यालय येथुन गेल्यापासुन ते सदर ठिकाणी परत येई पर्यंत काय घटना घडली या बाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार नितिन चव्हाण असे टि.व्ही.सेंटर परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे तक्रारदार यांचे खाजगी चारचाकी वाहनाने गेलो. सदर परिसरात गेल्यानंतर तक्रारदार यांचे सांगण्यावरुन एक व्यक्ती वाहनामध्ये बसल्यानंतर तो व्यक्ती ग्रामसेवक श्री.काथार असल्याचे तक्रारदार यांचे ईशाऱ्याने मला समजले सदर ठिकाणी वाहनामध्येच तक्रारदार यांच्या कामासंबंधाने व अनामत रक्कमे संदर्भात चर्चा होवून एकुण रक्कम किती निघते याची टोटल काढण्यात येवुन अनामत रक्कमचे चेक देण्या बाबत श्री.काथार यांना विचारले असता श्री. काथार यांनी सदर चेकवर श्री.सोळसे साहेब यांनी सहया केल्या नसल्याचे सांगितले त्यावर तक्रारदार यांनी सहया का केल्या नाही असे विचारले असता श्री.काथार हे म्हणाले की त्यांना चार-पाच हजार रुपये देवून टाका मग आपले माघचे पुढचे सगळे बिल निघून जातीन त्यावर तक्रारदार यांनी श्री. काथार यांचेकडून श्री. सोळसे यांचा संपर्क क्रमांक घेतला व त्यांना फोन करुन सदर चेक व डी.डी. संदर्भात माहिती दिली त्यावर श्री. सोळसे यांनी सदर चेक व डी.डी.वर सहया करुन देतो असे सांगितले. त्यानंतर परत तक्रारदार यांचे कामासंदर्भात श्री. काथार यांचेशी चर्चा झाली त्यावेळी श्री. काथार यांनी रहाळपटटी पाणी पुरवठा योजनेचे चार लाख सत्तर हजार रुपये व काही घन कचरा चे बिल जमा केले त्याचा मोबदला म्हणुन तक्रारदार यांचेकडे विस हजार रुपयांची मागणी केली. त्यावर तक्रारदार म्हणाले की, पैसे जास्त होता आहेत तुम्ही माझे सगळे चेक काढून माझ्या खात्यावर जमा होईल त्यावेळी मी दहा हजार रुपये देतो असे म्हणाले त्यानंतर श्री.काथार हे गाडीच्या बाहेर गेले व आम्ही तेथून तक्रारदार यांचे खाजगी



Scanned with OKEN Scanner

वाहनात बसुन ला.प्र.वि. कार्यालय या ठिकाणी परत आलो. तेथे पोहं/काळे यांनी तक्रारदार श्री. नितिन चव्हाण यांचे कडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद करून आपले ताब्यात दिला."अशी हकीकत सांगीतली.
त्यानंतर आम्ही पंच क्र. 2 यांचे समक्ष मुळ तक्रारदार श्री.चव्हाण यांचेकडे ते सुरक्षीत ठिकाणावरुन रवाना झाले ते परत सुरक्षीत ठिकाणी येणे पर्यंत काय झाले या बाबत विचारणा केली त्यांनीही पंच क्र. 1 यांचे सांगणे प्रमाणे तोंडी हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांचे समक्ष व्हॉईस रेकॉर्डर मध्ये लाचमागणी पडताळणीतील संभाषण ऐकले. त्यामध्ये रहाळपटटी तांडा ग्रामपंचायतचे ग्रामसेवक श्री.काथार यांनी मुळ तक्रारदार श्री.चव्हाण यांचेकडे त्यांचे रहाळपटटी पाणी पुरवठा योजनेचे चार लाख सत्तर हजार रुपये व काही घन कचरा चे बिल जमा केले त्याचा मोबदला म्हणुन 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 10,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले असल्याचे निष्पन्न झाले. लाचमागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार व ग्रामसेवक काथार यांचेत झालेल्या चर्चे दरम्याण अनामत रक्कमेचे चेक तक्रारदार यांचे खात्यावर जमा झाल्यानंतर लाचेची रक्कम देण्याचे ठरले. सदर अनामत रक्कम दिंनाक 20/02/2026 रोजी जमा झाल्याचे तक्रारदार यांनी सांगितले पुढील दोन दिवस शासकिय सुटटी व माझे खाजगी काम असल्याने मी दिंनाक 24/02/2026 रोजी ग्रामसेवक श्री.काथार यांना भेटणार असल्याचे सांगितले.
आज दिंनाक 24/02/2026 रोजी तक्रारदार श्री.नितिन चव्हाण यांनी ग्रामसेवक श्री.काथार यांना फोनवर संपर्क करुन कुठे आहे या बाबत विचारणा केली असता श्री.काथार यांनी तक्रारदार यांना टि.व्ही.सेंटर चौक, छत्रपती संभाजीनगर येथे भेटण्यास बोलावले. त्यावरून दोन्ही पंच, तक्रारदार असे सर्वानुमते आज दि. 24/02/2026 रोजी टि.व्हि.सेंटर चौक, छत्रपती संभाजीनगर परिसर येथे लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरले. सापळा कारवाईकामी संबंधीतास देण्यात येणाऱ्या रक्कमे बाबत मुळ तक्रारदार नितिन चव्हाण यांचेकडे विचारणा केली असता त्यांचेकडे 10,000/- रुपये रोख रक्कम असल्याचे त्यांनी कळवून सदर रक्कम पंचासमक्ष हजर केली. सदर रक्कम सापळा कारवाई कामी वापरण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.
सदरची फिंयाद ही मोठी असल्याने व प्रथम खबर मजकुरामध्ये 8000 शब्दांची मर्यादा असल्याने उर्वरीत फिंयाद पुढील पानावर घेण्यात येत आहे. करिता नोंद

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
Eknath Baliram Chavan
**Rank (पद):** HC (Head Constable) **No.(क्र.):** POBN62703
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with OKEN Scanner

**त्यानंतर सापळा कारवाईच्या अनुषंगाने आम्ही मुळ तक्रारदार व दोन्ही पंच तसेच सापळा पथक यांना योग्य त्या सविस्तर सुचना देवुन, अल्ट्राव्हाईलेट लॅम्प, ॲन्थ्रोसिंन पावडर, व्हॉईस रेकॉर्डर या बाबत सविस्तर मार्गदर्शन करुन अल्ट्रा व्हाईलेट लॅम्प, ॲन्थ्रोसिन पावडर व व्हॉईस रेकॉर्डर चे प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर** सापळा कारवाईच्या वेळी ग्रामसेवक श्री.काथार यांना लाच म्हणुन देण्याकरिता तक्रारदार श्री.नितिन चव्हाण यांनी हजर केलेली 10,000/- रुपये रोख रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या (20) भारतीय चलनी नोटांचे नंबर पंच क्र.2 श्री.दाभाडे यांनी कागदावर लिहुन तो कागद त्यांचेकडे ठेवुन घेतला. सदर नोटांना पो.अं. ताठे यांचे हस्ते ॲन्थ्रोसिन पावडर लावुन सदर रक्कम तक्रारदार यांचे नेसणीस असलेल्या पॅन्टच्या मागील उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवली. त्यानंतर तक्रारदार यांना सुचना केली की, ग्रामसेवक श्री.काथार यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर आपण पॅन्टच्या डाव्या खिशातील रुमाल डाव्या हाताने काढून चेहरा पुसून हातामध्ये ठेवावा असा लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजित ईशारा करावा. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतमध्ये कोणास दिसणार नाही असा लपविला. त्यानंतर तक्रारदार श्री.नितिन चव्हाण व पंच क्र.1 श्री.साजीद बेग असे तक्रारदार यांच्या मोटार सायकलने सुरक्षीत ठिकाणावरुन 18.25 वा. रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.2 व सापळा पथक असे खाजगी मोटार सायकलने व आमचे शासकिय वाहनाने गेलो. त्यानंतर तक्रारदार श्री.नितिन चव्हाण व पंच क्र.1 श्री.साजीद बेग असे टि.व्ही.सेंन्टर चौक छत्रपती संभाजीनगर येथे दादा डोसा हॉटेलच्या समोर मो.सा.उभी करुन दादा डोसा हॉटेलमध्ये गेले. आम्ही ही सापळा पथकासह सदर परिसरात दबा धरुन थांबुन राहिलो.

दादा डोसा हॉटेल येथे ग्रामसेवक श्री.काथार व तक्रारदार श्री.नितिन चव्हाण यांची भेट झाली. भेटी दरम्यान ग्रामसेवक काथार व तक्रारदार श्री.नितिन चव्हाण यांचे कामा संदर्भात चर्चा झाली त्यानंतर तक्रारदार हे ग्रामसेवक काथार यांना म्हणाले की, "Æêü घ्या, दहा हजार Æêü" त्यावर ग्रामसेवक काथार हे म्हणाले की, आणि सुराशे साहेबाचे त्यावर तक्रारदार म्हणाले की, सुरासे साहेबाचे आता उदया देतो तुम्हाला, आता हे पाणी पुरवठयाचे हे आपले त्यावर ग्रामसेवक श्री. काथार " हो " असे म्हणुन तक्रारदार यांनी पंच क्र. 1 यांचे समक्ष दिलेली 10,000/-रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली त्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारले बाबत पुर्वनियोजीत ईशारा केला त्यावेळी 18.48 वाजले होते. आम्ही सापळा पथकासह तात्काळ घटनास्थळी हजर आलो. आम्ही 18.49 वाजता ग्रामसेवक काथार यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही श्री.काथार यांना आमचा व सापळा पथकाचा परिचय देवुन त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.रानोबा विठोबा काथार, वय 50 वर्षे, पद-ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत रहाळपटटी तांडा ता.जि. छ.संभाजीनगर रा.दत्तमंदिराजवळ वसंतनगर, जाधववाडी, छत्रपती संभाजीनगर असे सांगितले त्यानंतर आम्ही दोन्ही पंचासमक्ष हॉटेल दादा डोसा येथेच ॲन्थ्रासिनं पावडर संदर्भातील प्रात्यक्षीक कार्यवाही केली. ग्रामसेवक काथार यांचेकडून त्यांनी स्विकारलेली लाचेची रक्कम 10,000/-रुपये हस्तगत करुन ती पंच क्र.2 यांचे ताब्यात दिली. त्यानंतर सदरचे घटनास्थळ हे वर्दळीचे असल्याने घटनास्थळाचे कच्चे टिपण घेवुन तेथुन आम्ही सर्वजन पुढील कार्यवाईकामी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे परत आलो. वरिल घटनेबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दि.24/02/2026 रोजी लोकसेवक श्री.रानोबा विठोबा काथार, वय 50 वर्षे, पद-ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत रहाळपटटी तांडा ता.जि. छ.संभाजीनगर रा.दत्तमंदिराजवळ वसंतनगर, जाधववाडी, छत्रपती संभाजीनगर यांनी मुळ तक्रारदार श्री.नितिन नंदु चव्हाण यांचे रहाळपटटी पाणी पुरवठा योजनेचे चार लाख सत्तर हजार रुपये व घन कचरा चे बिल जमा केल्याचा मोबदला म्हणुन तक्रारदार यांचेकडे 20,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 10,000/-रुपये लाचेची रक्कम दिनांक 24/02/2026 रोजी 18.48 वाजता हॉटेल दादा डोसा टि.व्ही.सेंन्टर चौक, छत्रपती संभाजीनगर येथे पंच क्र. 1 यांचे समक्ष स्वत: स्विकारले आहे. तसेच ग्रामपंचायत रहाळपटटी तांडा प्रशासक साहेबराव सोळसे यांना अनामत रक्कमेच्या चेकवर सही करण्यासाठी चार-पाच हजार रुपये दयावे लागतील असे म्हणुन त्यांचे नावाने लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडे मागणी केली आहे. म्हणुन माझी श्री.रानोबा विठोबा काथार, वय 50 वर्षे, पद-ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत रहाळपटटी तांडा ता.जि.छ.संभाजीनगर रा.दत्तमंदिराजवळ वसंतनगर, जाधववाडी, छत्रपती संभाजीनगर यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988 चे कलम 7, 7 (अ) प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

हि फिर्याद दिली सही.

गुन्हा दाखल करुन पुढील तपास पो.नि राजु नागलोद ने. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर हे करत आहे.

Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

PSI
पोलीस ठाणे अमंलदार
पोलीस ठाणे सिडको
छत्रपती संभाजीनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ATUL SHIVDAS YERM
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): ASYM8401



Scanned with OKEN Scanner